# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 380/2022 दिनांक : 03.10.2022**

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 02.10.2022 रोजी 03.45 वा. चे सुमारास, **नांदेड ते पुणेगाव रोडवरील वांगी पाटी येथे रोडवर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस व सोबतचे पोलीस अंमलदार यांचेकडे पिस्टल रोखुन दोन गोळ्या फिर्यादीच्या दिशेने फायर करून खुन करण्याचा प्रयत्न केला व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. फिर्यादी व त्यांचे सोबतचे पोलीस पथकाने स्वसंरक्षणासाठी फिर्यादीचे सर्व्हीस पिस्टल मधुन दोन राऊंड आरोपीच्या दिशेने फायर केले. तेंव्हा मो सा वर पाठीमागे बसलेल्या ईसम खाली पडला व जखमी आरोपीचा साथीदार मो सा वर पळुन गेला. वगैरे **फिर्यादी सपोनि/ श्री पांडुरंग व्यंकट माने, ने. स्थागुशा नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 593/2022 कलम 307, 353, 34 भादवि सह कलम 3/25, 27(2) भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री थोरात, मो. नं. 9823298315** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**1)शिवाजीनगर** :–दिनांक 29.09.2022 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **राठोड यांचे वाडयातुन विसावानगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा गडबडीत रुमला लॉक लावण्याचे विसरल्याने रुम उघडी ठेवुन मित्रासह क्लासला गेला व परत तीन वाजता आला असता रुम मधील एमएसआय कंपनीचा लॅपटॉप किंमती 25,000/–रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी वैभव प्रभाकर पाटील, वय 19 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. विसावानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 364/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो.क्र. 9075479885** हे करीत आहेत.

## 3)चोरीचा प्रयत्न :–

**1)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 02.10.2022 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **वाजेगाव बायपास येथे गोदावरी पुलाचे बांधकाम चालु असलेल्या ठिकाणी ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून पुलावर बांधलेली आडीच ते तीन फुट लांबीचे गजाळी 51 तुकडे अंदाजे पन्नास किलो किंमती 3000/–रूपयाचे चोरून मो सा घेवुन जाण्याचा प्रयत्नात असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी मोहम्मद असामेदीन पि. मकबुल अन्सारी, वय 29 वर्षे, व्यवसाय सुपरवाझर के. टी. कंपनी रा. मुत्तीखाम डिस्ट्रीक्ट प्लामो झारखंड ह. मु. स्वराज हॉटेल आसना ब्रिज नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 594/2022 कलम 379, 511, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/616 चक्रधर, मो.क्र. 7020448411** हे करीत आहेत.

## 4)भारतीय विद्युत कायदा :–

**देगलूर** :– दिनांक 30.09.2022 रोजी 23.00 ते दि. 01.10.2022 चे दरम्यान, **मौ. वन्नाळी शिवारातील माधव पिराजी येशमवार यांचे शेतातील विद्युत रोहित्रातुन ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने ट्रान्सफार्मर मधील ऑईल 155 लिटर किंमती 8525/–रूपयाचे स्वताचे फायदयासाठी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अंगद सोपानराव कावळगुड्डे, वय 34 वर्षे, व्यवसाय नौकरी वरिष्ठ तंत्रज्ञ देगलुर ग्रामीण रा. सुगाव ता. देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 468/2022 कलम 136 भारतीय विद्युत कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/2462 केंद्रे, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**1)इतवारा** :–दिनांक 30.09.2022 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **बर्कीचौक येथील दिल्ली स्वीटमार्ट समोरील ईलेक्ट्रीक डेपो समोर, सार्वजनिक रोडवर ईतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस बोलाविले तेंव्हा आरोपी हा फिर्यादीकडे गेला नाही ते राग धरून आरोपीने फिर्यादीस तोंडावर चापट मारून शिवीगाळ केली तेंव्हा फिर्यादीने मारहाणीचे जाब विचारता आरोपीने रागात येवुन खंजरने फिर्यादीचे उजव्या बाजुस कमरेवर मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी सिराजखान पि. जिलानीखान, वय 35 वर्षे, व्यवसाय मिस्त्री रा. आयनामहल टेकडी किल्लारोड इतवारा नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 272/2022 कलम 326, 323, 504 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पाउपनि/श्री मारकवाड, मो. नं. 8329319593** हे करीत आहेत.

Scanned with CamScanner

**2)विमानतळ :-** दिनांक 29.09.2022 रोजी 20.00 ते 20.30 वा. चे दरम्यान, फिर्यादीचे गोविंदनगर नांदेड येथील झिंगा बोंबील माशीचे दुकाना समोर नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस पुर्वीच्या भांडणाच्या कारणावरून लोखंडी रॉड, काठया व चक्र(लोखंडी) असलेले हत्याराने दोन्ही हातावर, दोन्ही पायावर, डोक्यात मारहाण करून गंभीर दखापत केली व छातीत व पाठीत मारहाण केली तसेच फिर्यादीची आई व बहीण सोडवण्यास आले असता त्यांना मुक्का मार दिला. वगैरे फिर्यादी बालाजी बाबुराव कांबळे, वय 34 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. गोविंदनगर नांदेड यांचे फिर्यादवरुन पोस्टे विमानतळ गुरन 335/2022 कलम 326, 324, 143, 147, 148, 149, 323, 504, 506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास सपोउपनि/श्री लोखंडी, मो. नं. 9527810006 हे करीत आहेत.

## 6)पळवुन नेले :-

**नांदेड ग्रामीण:-** दिनांक 01.10.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, वाजेगाव ता. जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीचा मुलगा नामे शेख जुनेद शेख अनिश, वय 14 वर्षे, रा. जामा मस्जिद वाजेगाव ता. जि. नांदेड हा किराणा दुकानावरून मॅगी पॉकीट आणतो असे म्हणुन गेला. तो परत आला नाही. त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे फिर्यादी शेख अनिश शेख महेमुद, वय 41 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. जामा मस्जिद वाजेगाव ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे नांदेड ग्रामीण गुरनं 596/2022 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास पोउपनि/श्री हंबर्डे, मो.क्र. 9823040224 हे करीत आहेत.

## 7)अपघात :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 01.10.2022 रोजी 04.00 वा. चे सुमारास, गोविंद गार्डन हाडको नांदेड उस्मानगर रोडवर ता. जि. नांदेड येथे, यातील मयत नामे अविनाश विक्रम डांगे, वय 29 वर्षे, व्यवसाय डॉक्टर रा. पोखरमोसी ता. लोहा जि. नांदेड यास यातील नमुद आरोपीने त्यांचे ताब्यातील कार क्र. एमएच-26/एस-0106 ही हयगय व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवुन मयताचे मो सा क्रं एमएच-26/बीआर-3194 हीस पाठीमागुन जोराची धडक देवुन मो सा चे नुकसान करून मयताचे डोक्यास गंभीर दुखापत करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे फिर्यादी गोविंद नाराण डांगे, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. पोखरमोसी ता. लोहा जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे नांदेड ग्रामीण गुरनं. 595/2022 कलम 279, ,304(अ), 427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोउपनि/श्री केंद्रे, मो.क्र. 9422188871 हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :-

**भाग्यनगर :-** दिनांक 02.10.2022 रोजी 13.45 वा. चे सुमारास, बी. के. हॉल समोरील परिसरात मुख्य रोडवर श्रीनगर नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने आपले ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या शस्त्र (खंजर) ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे फिर्यादी पोहेकॉ/2294 किशोर पांडुरंगराव हुंडे, ने. पोस्टे भाग्यनगर यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे भाग्यनगर गुरनं 342/2022 कलम 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास पोह/1781 मामीलवाड, मो.क्र. 9657578281 हे करीत आहेत.

## 9)जुगार :-

**1)भाग्यनगर :-** दिनांक 02.10.2022 रोजी 17.00 वा. चे सुमारास, ग्रॅंड मराठा लाजींग छत्रपती चौक रूम नं 209 नांदेड येथे, यातील नमुद पंधरा आरोपीतांना बिना परवाना बेकायदेशिररित्या तीर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 33,300/-रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे फिर्यादी सपोनि/श्री सुशांत गणपत किनगे, ने. पोस्टे भाग्यनगर यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे भाग्यनगर गुरनं 343/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोउपनि/श्री घुगे, मो.क्र. 9145385213 हे करीत आहेत.

**2)किनवट :-** दिनांक 02.10.2022 रोजी 14.40 वा. चे सुमारास, एसव्हीएम कॉलनीच्या मागील बाजुस हमाल कॉलनीकडे जाणारे कच्या रस्त्यालगत बाभळीच्या झाडाखाली किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी विना परवाना बेकायदेशिररित्या तीर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 50,240/-रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे फिर्यादी पोना/1326 गजानन रामदास चौधरी, ने. पोस्टे किनवट यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे किनवट गुरनं 194/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोउपनि/श्री मामीडवार, मो.क्र. 9850061133 हे करीत आहेत.

Scanned with CamScanner

## 10)प्रोव्हिबीशन :–

**1)हिमायतनगर :–** दिनांक 02.10.2022 रोजी 14.15 वा. चे सुमारास, **मोहम्मद मुझे यांच्या चिकन सेंटरच्या बाजुला बाजार गल्ली ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 1280/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1272 श्यामसुंदर गंगाधरराव नागरगोजे,** ने. पोस्टे हिमायतनगर यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 223/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2303 सिंगणवाड, मो.क्र. 9049075521** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 02.10.2022 रोजी 01.20 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे प्लांटवर असलेल्या गोटयाच्या बाहेर पश्चिम गोकुळनगर रत्नाळी ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 11550/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री शिवप्रसाद माधवराव कत्ते,** ने. पोस्टे धर्माबाद यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 226/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/आबेद, मो.क्र. 9823027835** हे करीत आहेत.

## 11)विषारी साप चावुन मृत्यु :–

**कुंटूर :–**दिनांक 23.09.2022 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **वार्ड क्रं 15 सरकारी दवखाना विष्णुपूरी नांदेड येथे,** यातील **मयत नामे हनुमंत प्रकाश गोरटकर, वय 14 वर्षे, रा. रूई ता. नायगाव जि. नांदेड,** यास गावातील भवानी मंदिराजवळ कोणता तरी विषारी साप चावल्याने त्यास उपचार कामी महिंद्रकर हॉस्पिटल नांदेड येथे उपचार करून पुढील उपचारासाठी स. द. विष्णुपूरी येथे शरीक केले असता उपचारा दरम्यान दिनांक 30.09.2022 रोजी 03.30 वा. मरण पावला आहे. वगैरे **खबर देणार पोहेकॉ/2801 डब्ल्यु के कांबळे,** ने. पोस्टे नांदेड ग्रामीण यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण आ. मृ. 26/2022** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1181 कुमरे, मो.नं. 8668543100** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

CS Scanned with CamScanner